# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/07/2021 (शनिवार)

---

### जबरी चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर नागपूर मनसर हायवे रोड वराडा शिवारातील बंद टोल नाका येथे दिनांक 02/06/2021 चे 22.20 वा. ते 22.40 वा. दरम्यान फिर्यादी नामे– बबलु तुलाराम सोनकुसरे, वय 32 वर्ष, रा. रामटेक हा नागपूर येथे सासुरवाडीला पत्नी व मुलीसह रामटेकला जात असतांना एक अनोळखी मोटरसायकल एवेंजर काळया रंगाची त्यावर बसून एक काळया रंगाचा शर्ट घातलेला व लांब केस असलेला आरोपीने फिर्यादीचे ॲक्टीव्हा गाडीच्या मागे येउन गाडीला लात मारून फिर्यादीच्या पत्नीच्या खांदयावरील लेडीज बॅग हिसकावुन पडुन गेला. बॅग मध्ये नगदी 8,000/–रू. व दोन ग्राम सोन्याची मनी कि. 9,700/–रू. व चांदीचे पायल 3,000/–रू. व एमआय कंपनीचा मोबाईल कि. 8,000/–रू. असा एकुण कि. 28,700/–रू. चा सामान, पैसे व कागदपत्रासह हिस्कावुन पडुन नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम 392 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री जावेद शेख 9403692766 हे करीत आहे.

### चोरी

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावर गहुहिवरा रेल्वे फाटकचा बाजुला ओम यादव यांचे शेतीजवळ कन्हान येथे दि. 27/06/2021 चे 08.00 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– अशोक भदुजी पाटील वय 59 वर्ष रा. धरम नगर पिपरी कन्हान यांनी 1 वर्षा अगोदर गहुहिवरा रेल्वेफाटक चा बाजुला यशवंत नगर कन्हान येथे ओम यादव यांचे शेताजवळ पाणी निकाशी करीता ठेवलेल्या सिमेंट कॉन्क्रेटच्या 600 व्यासाचा 4 पायल्या अंदाजे कि. 55,000/– रू. ठेवलेल्या होत्या घ.ता. वेळी आरोपी नामे– प्रभाकर दौलत नाटकर वय 50 वर्ष रा. विवेकानंद नगर, कन्हान याने जेसीबी च्या सहाय्याने फिर्यादीने ठेवलेल्या सिमेंट कॉन्क्रेटच्या 600 व्यासाचा 4 पायल्या चोरून घेउन गेला व आरोपीने आपले प्रगती नगर येथील घरासमोर नेवुन टाकल्याचे लेखी रिपार्ट वरून सदर गुन्हा नोंद.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथ आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनी सतिश मेश्राम हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 6 कि. मी. अंतरावरील काटोल ते घुबडमेट येथे दि. 02/07/2021 चे 13.10 वा. ते 13. 30 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– सौ निर्मला महादेवराव कडू, वय 69 वर्ष, रा. नरखेड या आपले पतीसह खंडाळा गावी जाण्याकरिता नरखेड बसमध्ये बसून जात असता काटोल ते घुबडमेट येथे अज्ञात आरोपीने फिर्यादीचे जवळील हॅन्डबॅग मध्ये ठेवलेली छोटी पर्स ज्यामध्ये 42 ग्रॅमची सोन्याची पोत किंमती अंदाजे 65,000/–रुपयाची ठेवलेली होती ती पर्स चोरून नेली.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथ आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक सुनिल ठोंबरे 9011026414 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 23 कि.मी. अंतरावरील मोहगाव भदाडे जटमजरी फाटा नरखेड येथे दिनांक 01/07/2021 चे 19.00 वा. ते दिनांक 01/07/2021 चे 19.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– धूमसिंग घोटूसिंग जाधव ( तहसिलदार नरखेड ) वय 55 वर्ष यांनी एमएच– 12/ आरएन– 0183 कमांकाचा ट्रक चालक आरोपी क. 1) अब्दुल अनिस रा. देशमूखपूरा.ता.वरुड.जि.अमरावती, एमएच– 49/ ऐटी– 2497 कमांकाचा ट्रक चालक आरोपी क. 2) यशवंत निबाजी पाटील, रा. रवाडा. ता.वरुड. जि.अमरावती, 3) ट्रक क 1 चा मालक राम खासबागे रा. ता.वरुड.जि.अमरावती, 4) ट्रक क 2 चा मालक राम गुज्जर रा. ता.वरुड, जि.अमरावती यांचे वाहन तपासले असता वाहनाची रॉयलटी नसल्याने फिर्यादी हे आरोपीतांवर कार्यवाही करीत असतांना आरोपीतांनी संगणमत करुन त्यांचे ट्रक मधून रेती खाली करुन यांचे ताब्यातून एमएच– 12/ आरएन– 0183 कमांकाचा डम्पर व एमएमच– 49/एटी– 2497 कमांकाचा डम्पर किमंती 20,00000/–रु व 10 ब्रास रेती किमंती 30,000/–रु. असा एकूण किमंती 20,30,000/– रु चा माल पळवून नेले.

सदर प्रकरणी सरतर्फे धूमसिंग घोटूसिंग जाधव वय 55 वर्ष तहसिलदार नरखेड यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा धनराज भुक्ते मो नं 9823612858 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यु

पो. स्टे. नरखेड :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील मौजा पारडी येथे दिनांक 09/06/2021 चे 15.00 वा. दरम्यान पांडूरंग सूर्यभान महेन्द्रे वय 60 वर्ष रा. नरखेड हा दि 09/06/21 रोजी ईलेक्ट्रीक डी पी वर फयुज टाकन्या करीता चढले असता त्यांना इलें. कंरट लागल्याने उपचार सूरु असता दि 15/06/21 रोजी मरण पावल्याने आज संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा विकास बेलसरे मेडीकल बुथ नागपुर यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोना राजेश हावरे पो स्टे नरखेड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर